## श्रीगुरूप्रसाद – याचना – दशक

रूसो मम प्रियांबिका, मजवरी पिताही रूसो ।
रूसो मम प्रियांगना, प्रियसुतात्मजाही रूसो ।।
रूसो भगिनी बंधुही, श्वशुर सासुबाई रूसो ।
न दत्तगुरू साई मा, मजवरी कधीहीं रूसो ।।१।।

पुसो न सुनबाई त्या, मज न भ्रातृजाया पुसो ।
पुसो न प्रिय सोयरे, प्रिय सगे न ज्ञाती पुसो ।।
पुसो सुहृद ना सखा, स्वजन नाप्तबंधू पुसो ।
परी न गुरू साई मा मजवरी, कधीहीं रूसो ।। २ ।।

पुसो न अबला मुलें, तरूण वृद्धही ना पुसो ।
पुसो न गुरू धाकुटें, मज न थोर सानें पुसो ।।
पुसो नच भलेबुरे, सुजन साधुही ना पुसो ।
परी न गुरू साई मा, मजवरी कधीहीं रूसो ।। ३ ।।

रूसो चतुर तत्वंवित्, विबुध प्राज्ञ ज्ञानी रूसो ।
रूसोहि विदुषी स्त्रिया, कुशल पंडिताही रूसो ।।
रूसो महिपती यती, भजक तापसीही रूसो ।
न दत्तगुरू साई मा, मजवरी कधीहीं रूसो ।। ४ ।।

रूसो कवि ऋषी मुनी, अनघ सिद्ध योगी रूसो ।
रूसो हि गृहदेवता, नि कुलग्रामदेवी रूसो ।।
रूसो खल पिशाच्चही, मलिन डाकिनीही रूसो ।
न दत्तगुरू साई मा, मजवरी कधीहीं रूसो ।।५ ।।

रूसो मृग खग कृमी, अखिल जीवजंतु रूसो ।
रूसो विटप प्रस्तरा, अचल आपगाब्धी रूसो ।।
रूसो ख पवनाग्नि वार, अवनि पंचतत्वें रूसो ।
न दत्तगुरू साई मा, मजवरी कधीहीं रूसो ।।६ ।।

रूसो विमल किन्नरा, अमल यक्षिणीही रूसो ।
रूसो शशि खगादिही, गगनिं तारकाही रूसो ।।
रूसो अमरराजही, अदय धर्मराजा रूसो ।
न दत्तगुरू साइ मा, मजवरी कधीहीं रूसो ।। ७ ।।

रूसो मन सरस्वती, चपलचित्त तेंही रूसो ।
रूसो वपु दिशाखिला, कठिण काल तोही रूसो ।।
रूसो सकल विश्वही, मयि तु ब्रह्मगोल रूसो ।
न दत्तगुरू साइ मा, मजवरी कधींही रूसो ।। ८ ।।

विमूढ म्हणूनी हसो, मज न मत्सराही डसो ।
पदाभिरूचि उल्हासो, जननकर्दमीं ना फसो ।।
न दुर्ग धृतिचा धसो, अशिवभाव मागें खसो ।
प्रपंचि मन हें रूसो, दृढ विरक्ति चित्तीं ठसो ।। ९ ।।

कुणाचिही घृणा नसो, न च स्पृहा कशाची असो ।
सदैव हृदयीं वसो, मनसि ध्यानिं साई वसो ।।
पदीं प्रणय वोरसो, निखिल दृश्य बाबा दिसो ।
न दत्तगुरू साइ मा, उपरि याचनेला रूसो ।। १० ।।